# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली -४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in

जा.क्र./गो.वि.ग./म.वि.वि.वि./ 916 /२०२६ दि. २८/०७/२०२६

## परिपत्रक

विषय:- ई-समर्थ पोर्टलवरील ईमेल आयडी व मोबाईल क्रमांक बदल करणेबाबत.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील मा. प्राचार्य यांना कळविण्यात येते की, ई-समर्थ प्रणालीमध्ये नुकतेच सुरक्षा अद्ययावत (Security Update) करण्यात आले असून लॉगिन, पासवर्ड बदल, तसेच महत्त्वाच्या माहितीतील बदलांसाठी OTP आधारित प्रमाणीकरण (OTP Authentication) अनिवार्य करण्यात आले आहे. सदर OTP हा प्रणालीमध्ये नोंद असलेल्या ईमेल आयडी व मोबाईल क्रमांकावरच प्राप्त होतो. याबाबत विविध संलग्नित महाविद्यालयांकडून अशाच प्रकारच्या अडचणी प्राप्त होत आहेत.

करीता ज्या महाविद्यालयांना ई-समर्थ पोर्टलवरील ईमेल आयडी व मोबाईल क्रमांक बदल करावयाचा असेल अशा महाविद्यालयांनी सोबत संलग्नित प्रपत्रामध्ये माहिती भरुन दि. ०५/०८/२०२६ रोजी पर्यंत महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभागाच्या college.section@unigug.ac.in या ई-मेल आयडी वर तसेच हार्ड कॉपीव्दारे तातडीने विद्यापीठात सादर करावे. सदर माहिती विहीत मुदतीत सादर न केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील, करीता नोंद घ्यावी. तसेच वरील बदलाबाबत खालील सुचनांचे पालन करावे.

**सहपत्र:- संलग्नित प्रपत्र.**

**सुचना:-**
**१. सदर माहिती महाविद्यालयाच्या अधिकृत लेटरहेडवर सादर करावी.**
**२. नविन मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी हे नियमित वापरात असलेले व कार्यरत (Active) असावेत.**
**३. दिलेल्या मोबाईल क्रमांक व ईमेल आयडीवर OTP प्राप्त होईल, त्यामुळे माहिती अचूक भरावी.**
**४. प्राचार्यांची स्वाक्षरी व महाविद्यालयाचा अधिकृत शिक्का असलेले पत्रच ग्राह्य धरले जाईल.**
**५. सदर माहितीच्या आधारे ई-समर्थ प्रणालीमध्ये आवश्यक बदल करण्यात येतील.**

मा. प्र-कुलगुरू यांच्या मान्यतेने,

( श्री. दिनेश नरोटे )
सहाय्यक कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रति,

मा. प्राचार्य,
संलग्नित सर्व महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी :-

१. मा. कुलगुरु महोदय यांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
४. मा. नोडल अधिकारी, ई-समर्थ प्रणाली, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

Scanned with OKEN Scanner

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | कॉलेज कोड | प्राचार्यांचे नाव | User Name / Login ID | विद्यमान मोबाईल क्रमांक | नविन मोबाईल क्रमांक | विद्यमान ईमेल आयडी | नविन ईमेल आयडी | बदल करण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 1 | | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | | |
| 3 | | | | | | | | | |

प्राचार्य
(स्वाक्षरी व शिक्का)

Scanned with OKEN Scanner